
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

International Multilingual Research Journal

# VIDYAWARTA®

Issue-18, Vol-06, April to June 2017



Editor
Dr.Bapu G. Gholap

www.vidyawarta.com

15) HISTORIC AND CULTURAL ELEMENTS IN NIRAD CHAUDHURI'S THE AUTOBIOGRAPHY OF.....
Dr. Raheel K. Quraishi, Nagpur || 68

16) Good Governance Problems and Challenges In India Good Governance and corporate Sector
Mrs. Chhaya Sharma, Bhopal, Dr. Bharat Singh Goyal, Raisen (M.P.) || 71

17) संस्कृतीतून साहित्याची जडणघडण
प्रा. डॉ. बाळासाहेब एस्. चव्हाण, कोरेगाव || 75

18) प्रा. मे. पू. यांचे 'भारतीय दर्शन' विचार
डॉ. संजय ह. पाटील, देगलूर. || 79

19) भारतीय स्त्री : काल, आज आणि उद्या
डॉ. अल्पना देवकर, बाळापुर || 83

20) बालमजुरीची समस्या : समाजापुढील एक आव्हाणं
डॉ. विजय शंकरराव दिघोरे, जि. नागपूर || 87

21) संशोधनाचा विषय : हळदीची उत्पादन प्रक्रिया व उत्पादकाच्या समस्या आणि उपाययोजना
प्रा. हरेश टि. गजभिये, नागपूर, प्रा. डॉ. जयंत बी. लांजेवार, नागभिड || 90

22) राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे स्त्रीविषयक विचार
विठ्ठल जीवतोडे, यवतमाळ || 94

23) महात्मा बसवेश्वरांच्या वचन साहित्याचे स्वरुप
प्रा. डॉ. जगताप उज्जवला शिवराम, परभणी || 100

24) सृजनात्मकता आणि अनुवाद यांच्यातील परस्पर संबंध
प्रा. निलेश एकनाथराव लोंढे, परभणी || 103

25) ग्रामीण भारताच्या विकासात महिलांचे योगदान : सुक्ष्म वित पुरवठा चळवळ
प्रा. संजय सदाशिवराव मंडलिक, प्रा. डॉ.टी.एम्. पाटील, कोल्हापूर || 105

26) संसदीय कामकाजाचे अवमूल्यन
प्रा. कल्पना निंबार्ते, भंडारा || 111

27) विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या : कारणे व उपाय
प्रा. डॉ. बी. व्ही. राठोड, कळंब || 114

28) आधुनिक समाज जीवनातील वृध्दांपुढील आव्हाने
कु. मीना गणपतराव संत || 117

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com

**18**

# प्रा. मे. पू. यांचे 'भारतीय दर्शन' विचार

**डॉ. संजय ह. पाटील**
(तत्वज्ञान विभागप्रमुख)
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

***********

भारतीय तत्वज्ञान आधुनिक तत्वज्ञानापासून स्वतंत्र आत्मसमाधानी असलेले दिसते. प्रा.रेगे यांना या संदर्भात विचार करीत असताना एक प्रश्न सतत स्वस्थ करीत की, प्राचीन भारतीय तत्वज्ञानाचे आधुनिक जगातील एका नागरिकाच्या दृष्टीकोणातून काय महत्व आहे ? याच दृष्टीकोणातून प्राचीन भारतीय तत्वज्ञानाचा अर्थ लावण्याचा प्रश्नही एक तत्वज्ञानाच्या अभ्यासू विद्यार्थ्यांसमोर महत्वाचा प्रश्न आहे.

'तत्वज्ञान' म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर आपण भाषेत तत्वज्ञान हा शब्द कोणत्या अर्थाने वापरतो यावर ते अवलंबून राहिल असे रेंगे यांना वाटते. त्याचप्रमाणे दृष्य आणि त्याविषयी मानवी ज्ञानात गृहित धरलेल्या संकल्पना स्पष्ट करणे हेही तत्वज्ञानाचे कार्य आहे. मानवी ज्ञानाविषयीची संकल्पना ही वेगवेगळ्या तात्विक चिकित्सेप्रमाणे निरनिराळी वाटते. तात्विक चिकित्सा आणि योग्य पध्दती आणि पध्दतीचे निरनिराळे ध्येये, आणि त्यांना मिळालेली निरनिराळ्या स्तरावरील मान्यता व त्यातील अनुक्रम हे तात्विक चिकित्सेचे फळ होय. तो एका तात्विक दृष्टीकोणाचा परिणाम असतो. दुसऱ्या शब्दांत सांगावयाचे म्हणजे तत्वज्ञानाचे स्वरुप आणि तात्विक चिकित्सेचे उद्दिष्ट कोणते ? हा प्रश्नच मुळात तात्विक आहे. या प्रश्नाचे उत्तर आपण तत्वज्ञान विषयक कोणता दृष्टीकोण स्वीकारणार आहोत यावर अवलंबून असते. अशा दृष्टीकोणातून तत्वज्ञानाची व्याख्या करीत असताना प्राचीन पारंपरिक तत्वज्ञानाकडे व्यापक आणि उदारमतवादी दृष्टीकोणातून पाहिले पाहिजे.

आपण आधुनिक आणि प्राचीन भारतीय तत्वचिंतनांच्या परंपरेत काही वैशिष्ट्ये आहेत असे गृहीत धरण्याचे कारण नाही. 'कुलसाम्य' हेच एक वैशिष्ट्ये सर्व तात्विक चिकित्सेत दिसून येते. प्रा.रेंगे यांना वाटते. याच वैशिष्ट्याच्या आधारे तत्व--ज्ञानाच्या व्यक्तीची संकल्पना आपण करु शकतो असे त्यांना वाटते.

तत्वज्ञानाचे उद्दिष्ट काय ? या संदर्भात रेंगे एक प्रश्न विचारतात की, या विश्वाचे स्वरुप काय ? या प्रश्नाचे उत्तर शोधताना आणि विचार करण्याच्या पध्दतीमुळे प्राचीन दृष्टीकोन भिन्न वाटतो. (कारण ते पुराण कथा व यातूविद्येच्या साह्याने स्पष्टीकरण करतात) µÖÖ©ü-ÖÖë ¯ÖÏú™üßÖÖë विज्ञानाचा इतिहास' होय. विज्ञानाचे स्वरुप स्पष्ट करण्याच्या प्रयत्नाचा सुसंगत इतिहास म्हणजेच तत्वज्ञानाचा इतिहास होय असेही त्यांना वाटते. कारण तो एक विश्वाचे स्वरुप काय आहे. ते कशापासून बनले आहे याचा तो विचार असतो. सर्व शास्त्राचे हेच कार्य आहे. हा प्रश्न आपल्या दृष्टीकोणातून तितकासा महत्वाचा नाही. आधुनिक काळातील 'विज्ञानाचा विकास' व त्याच्या अभ्यासाचे क्षेत्र विश्वाच्या स्वरुपाचाच एक भाग आहे. वरील प्रश्न ज्ञानाचे एकत्रीकरण करण्याच्या दृष्टीकोणातून विचारला जातो. माणुस आणि विश्व याचा विचार शास्त्रज्ञानाच्या दृष्टीकोणातून एकत्रणे करतात. अशा प्रकारे जीववस्तू मायाकडे पाहण्याचा दृष्टीकोण विज्ञानामुळे निश्चित होतो. अशा प्रकारचे चित्र आणि त्याकडे पाहण्याची मनोवृत्ती व तसेच मानवी जीवनाचा एक क्रम आणि त्या दृष्टीकोणतून उद्दिष्टे स्पष्ट होतात. अशा प्रकारचा दृष्टिकोण आतापर्यंत उपलब्ध असलेल्या सुप्रस्थापित मानवी ज्ञानावर आधारलेला असतो. ते कांही एका विवेचित शास्त्राचे कार्य असू शकत नाही.

अशा प्रकारचे कार्य निरनिराळ्या शास्त्राच्या संशोधनाचे फळ होय. तसेच ते तत्वज्ञानाचे पण कार्य होय. मानवी व मानवी वर्तन यात एक सुसंगती माणनाऱ्या बुध्दीजीवी मानमाचे कार्य होय. असे रेगे यांना सतत वाटते.

हाच प्रश्न निराळ्या दृष्टीकोणातून असा विचारता येईल वास्तविक विश्वाचे स्वरुप काय आहे ? वास्तव आणि आभास यात विरोध असतो विज्ञानाचा अभ्यास विषय हा आभास असल्यामुळे त्याद्वारे मिळणारे मर्यादीत ज्ञान वास्तविक विश्वाच्या स्वरुपाचा निर्णायकपणे उलगडा करु शकत नाही वैज्ञानिक ज्ञान हे अति भौतिकी सहाय्यभुत ठरते. अतिभौतिकी ज्ञान हे विश्वाच्या अंतिम सत्तेचे ज्ञान असते. अतिभौतिकी ज्ञान हे विश्वाच्या वास्तविक स्वरुपाचे असून, अशा प्रकारचे ज्ञान एका अनुभवपूर्व प्रणालीच्या आधारविधानातून निष्पन्न झालेले असते. अशा प्रकारची तत्वे आणि प्रणाली अनुभवजन्य व बौध्दीक पण नसतात. अतिमीत्तिक ज्ञान हेच विश्वाच्या वास्तविक स्वरुप स्पष्ट करु शकते. विज्ञानांचा अभ्यासविषयक आणि व्याप्ती मर्यादित असते. विज्ञानाच्या कक्षेत विश्वाचे अंतिम स्वरुपाचे ज्ञान येऊ शकत नाही. तत्वज्ञानाच्या आधारे आपले शास्त्रे आणि शास्त्राच्या गृहितांची चिकित्सा करु शकतो. अशा चिकित्सेत आपण शास्त्राचे दोष दाखवित असतानाच आपण अतिभौतिक ज्ञानाचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करीत असतो असे प्रा.रेंगे यांना वाटते.

गुढ अनुभव अनिवार्यतेने अनुभवपूर्ण असतात. त्यांचे शास्त्रीय परिणातः स्वरुप म्हणजेच सुसंगत प्रणाली करण होय. कोणत्याही व्यक्तीला गुढ स्वरुपाचे अनुभव येऊ शकतात. परंतू अशा स्वरुपाचे अनुभव विश्वाच्या गुढ स्वरुपाचा उलगडा करु शकत नाहीत. अशी जाणीव जेव्हा अनुभवकर्त्यास होते तेंव्हा तो त्या अनुभवा विषयी असमाधानी होतो.

परंतू अशा प्रकारचे गुढ अनुभव म्हणजे तत्वज्ञान नव्हे जर गुढ अनुभवाने विश्वाच्या वास्तविक स्वरुपाचे ज्ञान होते असे जर मानले तर अशा प्रकारच्या अनुभवाने विश्वातील अंतिम सत्तेचे बौध्दिक दृष्टीकोणातून समर्थन करता आले पाहिजे. दुय्यम दर्जाची सत्ता आणि तिचा दर्जा व गुण इत्यादीच्या व तसेच दैनंदिन अनुभवाला येणारी सत्ता व ह्या सर्वांचे समर्थन बौध्दिक दृष्टीकोणातून करता आला पाहिजे. अशा प्रकारचा दृष्टीकोण चिकित्सेवर अधिष्ठित असून स्वतंत्र निकष व पध्दतीला महत्व देणारा असतो त्यामुळे तात्विक विधायक चिकित्सा करणे शक्य होते दैनंदिन अनुभवांत आपण वापरीत असलेल्या संकल्पनांची विश्वविषयीच्या सर्वसामान्य दृष्टीकोणावर आधारलेल्या असतात. अशा संकल्पनाची चिकित्सा करुन संकल्पनातील परस्परसंबंध आणि तिचे वैशिष्ट्ये स्पष्ट करणे हीच तत्वज्ञानाची भूमिका आहे. शास्त्रीय विचाराच्या विकासा बरोबर निर्माण होणाऱ्या संकल्पनेचे स्वरुप स्पष्ट करणे ही तत्वज्ञानातील महत्वाची भूमिका आहे. तत्वज्ञान हे वस्तू बदल कारण, अवकाश, स्थल काल, संख्या, नियम, इत्यादी संकल्पनांची व्याख्या, आणि त्यातील परस्पर संबंध व विरोध करणे हेत तात्विक चिकित्साचे कार्य आहे.

तत्वज्ञ बौध्दिक अतिभौतिक शास्त्राची शक्यता मान्य करुन, तो चिकित्सक दृष्टीकोणातून (मूल्याची संकल्पना), सत्य, ज्ञान, युक्तता, पुरावा, इत्यादी सर्वसामान्य दृष्टीकोणावर आधारलेले आमचे ज्ञान वरील संकल्पनांचा उलगडा करु शकत नाही असे ज्ञान शास्त्रीय निकषावर टिकु शकत नाहीत. तत्वज्ञानाची प्रेरणा नेहमी अशी असेलच अशी नाही अशा संकल्पनाचे योग्य आकलन होण्यासाठी व विश्लेषण करण्यासाठी शास्त्रय विचाराची तात्विक रचना किंवा संकल्पनाच्या समर्थनासाठी अशा प्रकारच्या दृष्टीकोणाची आवश्यकता असते.

अशा प्रकारचा दृष्टीकोण नवीन तत्वाचे स्वरुप स्पष्ट करणे, तसेच प्रस्थापित पध्दतीची चिकित्सा व मूल्यमापन व दोषाचे वर्णन आणि नवीन पध्दतीचा शोध तिचे स्वरुप व तात्विक संशोधनाचे स्वरुप यावर प्रकाश टाकणे हे कार्य होय. मानवी ज्ञानाची दिशा स्पष्ट होईल. प्लेटो आणि त्याचे शिष्य यांनी निगमनात्मक भूमितीच देणे आधुनिक जगाला दिलेली आहे. दकार्त व न्यूटन यांनी 'गणित' व 'पदार्थ विज्ञानाला' नवा आधार मिळवून दिलेला आहे. या व्यापक दृष्टीकोणातून भारतीय दर्शनकारांनी निर्माण केलेले तत्वज्ञान कितपत टीकू शकते ? हा प्रश्न मूलभुत व विचार करण्यासारखा आहे. असे रेगे यांचे मत आहे.

अस्तित्वाचे स्वरुप काय ? या प्रश्नाचे विचार भारतीय विचारवंतांनी केला. त्यापैकी नासदीय सुक्तामध्ये प्रथम उपस्थित करण्यात आला. हा प्रश्न म्हणजे आश्चर्य व गोंधळातून निर्माण झ ाला असे त्याचे मत आहे. वैदिक विचारवंतांनी आश्चर्य आणि गोंधळ यातूनच वरील प्रश्न विचारला असे दिसते. उपनिषदातील सर्व विचार वस्तूंच्या विविधतेतील एकता शोधण्याकडे दिसतो. सांख्यदर्शनातील प्रकृतीची संकल्पना ही तीन घटकांपासून बनलेली असून व विश्वातील विविधता कशी निर्माण झाली या विषयीची तात्विक संकल्पना या मूलभूत या संकल्पनेतून विविधता निर्माण झालेली असून मूळात द्रव्य मात्र प्रकृती एकच आहे. वैशेषिक दर्शनातील अणुवादाची उपपत्ती विश्वातील विविधता स्पष्ट करण्यासाठी सादर करण्यात आलेली आहे.

भारतीय तत्वज्ञानाच्या विकासाच्या आरंभी विविधतेचा उलगडा करण्यासाठी वस्तूच्या स्वरुपाच्या एक तत्वाची संकल्पना ही अत्यंत महत्वपूर्ण व भारतीय दर्शनाचे वैशिष्ट्ये म्हणून सांगता येईल असे रेगे यांना वाटते.

प्राथमिक अवस्थेतील दुसरे वैशिष्ट्ये म्हणजे जीव व मन, पदार्थ वेगळे नसून, एका विश्वात्मक वस्तूचा विकास म्हणता येईल. ती वस्तूच सत् होय. मन आणि पदार्थ अशा प्रकारचे वर्गीकरण संकल्पना म्हणजे गुणांची संस्था मन पदार्थ ज्या घटकांपासून बनलेला आहे. ते द्रव्य वैशेषिकाने मान्य केले आहे. या काळात तत्वज्ञान व विज्ञान एकच समजण्यात येत असे. या काळातील विचार तितकेशे परिपक्व व अमूर्त झालेले नव्हते. संकल्पना व संकल्पनातील तार्किक स्वरुप तेवढे स्पष्ट झालेले नव्हते. वस्तु आणि वस्तुतील शलचालीचे स्पष्टीकरण करण्याचा प्रयत्न म्हणजेच विज्ञान अशी त्या काळात धारणा होती, परंतू तो प्रयत्न आता केवळा जिज्ञासेचा विषय झालेला आहे.

भारतीय दर्शनाचा विचार करणाऱ्या रेगे यांच्या प्रतिभेला जाणवलेले वैशिष्ट्ये असे की, आजपर्यंत अनेक विचारवंतानी भारतीय तत्वज्ञानावर लेखन केले आहे. पण त्यांनी भारतीय दर्शनाच्या परंपरेसंबंधी अनिश्चित, संदिग्ध अशा दृष्टीकोणाचा स्वीकार केलेला दिसून येतो. भारतीय विचारवंतांची भारतीय दर्शनावर भाष्य करण्यामागणी प्रेरणाचा निराळी दिसते. मूळात भारतीय दर्शनाचे स्वरुप काय आहे. याचा विचार न करता, पारंपारिक भारतीय तत्वज्ञानावर भाष्य करताना ते स्वतःचा अर्थ सांगतात. उदा : टिळकांचे गीताभाष्य

हे गीतेवरील केवळ भाष्य नसून भाष्याच्या स्वरुपात टिळकांनी स्वतःचा नैतिक दृष्टीकोण पण स्पष्ट केला आहे. सांख्य दर्शनातील उपपत्ती भौतिक मानसिक घटनांचे स्पष्टीकरण होय. गुणा संबंधीची उपपत्ती ही वैज्ञानिक उपपत्ती नाही. वैज्ञानिक उपपत्ती ज्या पध्दतीने कार्य करु शकते त्या स्वरुपात गुणाची उपपत्ती कार्य करु शकत नाही.

तात्विक उपपत्तीचे स्वरुप काय ? तात्विक उपपत्ती ही वैज्ञानिक उपपत्तीपेक्षा कोणत्या बाबतीत भिन्न ठरते ? युक्ततेचा निकष कोणता ? असे प्रश्न अत्यंत मुलभूत व महत्वाचे आहेत, जर तत्वज्ञान आणि विज्ञान एकमेकांपासून वेगळे केल्यास या सर्व प्रश्नांचा विचार भारतीय दर्शनावर भाष्य करणाऱ्यांनी केलेला नाही. ही खंत प्रा.रेंगे यांना सतत वाटत आलेली आहे. मग अशा वेळी रेगे यांना दुःखाने म्हणावे लागते की, भारतीय दर्शनाच्या परंपरेतील बऱ्याच मोठ्या भागाचा विचार भाष्यकारांनी सोडून दिलेला आहे असे वाटते.

मानव आणि विश्व या विषयीचा एक दर्जेदार दृष्टीकोण बौध्द, न्याय, वैशेषिक, वेदान्त, प्रणालीत दिसून येतो. कारण द्रव्य व्यक्ति, ज्ञान, इत्यादी संकल्पनाचे अत्यंत तर्क कर्कश व मर्मग्राही विश्लेषण झालेले आहे असे त्यांना वाटते. त्याचप्रमाणे नैतिक दर्शनाचे युक्त चित्र त्या दर्शनात दिसून येते. ज्ञान शास्त्रीय व सत्ता शास्त्रीय कोटी आपणास विसंगत वाटतात. कारण ते वर्गीकरण विज्ञान पूर्व युगातील आहे.

शास्त्रीय पध्दतीच्या आणि शास्त्र यांच्या विकासा बरोबर निर्माण होणाऱ्या नवीन संकल्पनाचा होणारा विकास पण महत्वाचा आहे. त्याच प्रमाणे त्याचा विकास कसा होत गेला हे पण महत्वाचे आहे. पण एवढेच काही तत्वज्ञानाचे अत्यंत महत्वाचे कार्य आहे. पण एवढेच काही तत्वज्ञानाचे उद्दिष्ट नाही. आपण वापरीत असलेल्या संकल्पना ह्या आपल्या दैनंदिन अनुभ्ज्ञवावर आधारलेल्या असतात. परंतू त्यात तार्किक सुसंगती नसते. तेंव्हा अशा संकल्पनाची तार्किक चिकित्सा करुन त्याचे परस्परसंबंध ठरविणे हे तात्विक क्रियेचे उपयुक्त असे ध्येय आहे.

भारतीय दर्शनाच्या प्रगतीचा विचार विश्लेषणात्मक दृष्टीकोणातून केल्यास भारतीय तत्वज्ञानाचे डोळ्यात भरण्यासारखे जर कोणते वैशिष्ट्ये रेगे यांना जाणवत असेल तर विचारांचे विश्लेषण हे होय. संकल्पनाचे तार्किक विश्लेषण व स्वरुप स्पष्ट करण्याकडे प्राचीन भारतीय दर्शन कारांची ओढ दिसून येते. नवन्याय दर्शन भारतीय दर्शन परंपरेतील शेवटचे दर्शन म्हणता येईल असे रेगे यांना वाटते.

पाश्चात्य जगात झालेल्या भौतिक शास्त्राची प्रगती ही मानवजातीला मिळालेले वरदान समजावे. वैज्ञानिक मनोवृत्ती वस्तुस्थिती बद्दल वाटणारा एक आदराचा भाग होय. कोणत्याही सिध्दांतांची परिक्षा मात्र या कठोर वास्तवाच्या निकषावरच होत असते. जो सिध्दांत या निकषावर टिकतो तेंव्हा तो मात्र सार्वत्रिकतेचा दावा करीत असतो. सार्वत्रिक वस्तुस्थितीचे नियमापासून उदाहरण म्हणून वस्तुस्थितीचे महत्व असते. ह्या दीर्घ प्रयत्नांचे उद्दिष्ट एका विविक्षित नियमांपासून अधिक व्यापक नियम निर्माण करण्याच्या प्रयत्नात सांगता येते.

येथे हे ही लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, शास्त्रीय ज्ञान हेच 'बौध्दिक आकार' असून हाच वस्तुस्थितीच्या स्वरुपाचा युक्त आकार मानता येईल. परंतू या संदर्भात भारतीय दर्शन परंपरेचा विरोध दिसून येईल. बौध्दिक ज्ञानाच्या एकमेव प्रक्रियेला मान्यता देण्यास भारतीय दर्शनाचा दृष्टीकोण अनुकूल दिसत नाही याच संदर्भात भारतीय चिंतक शास्त्रीय ज्ञान व ज्ञानाच्या पध्दतीचा शोध घेण्यात का अयशस्वी झाले ? अशा प्रकारची खंत रेगे यांना वाटते या प्रश्नाचा गंभीरपणे विचार करणे आवश्यक असे होते आपले मत नोंदवितात. भारतीय दर्शनकाररांनी तात्विकरणासाठी ज्या पध्दतीचा उपयोग केला. ती पध्दती म्हणजे भाष्य करण्याची पध्दती होय. भाष्य हे सूत्रावर करण्यात येत असे त्या भाष्यावर पुन्हा भाष्य करणे ही भारतीय दर्शनकारांनी पध्दती होय मूळात सुत्राचा जो अर्थ असे तो तार्किक दृष्टिकोणातून स्पष्ट करणे हा या पध्दतीचा हेतू होय.

भारतीय दर्शन हे खऱ्या अर्थाने तत्वज्ञानाच नाही असेही ते मत व्यक्त करतात. तर ते अध्यात्मासारखे आहे. भारतीय दर्शनाचा उगम स्वतंत्र चिंतनातून झालेला नाही. पूर्वप्रस्थापित जे गृहितत्व आहेत. त्या पासून निष्पन्न होणाऱ्या अर्थांचे सुसंगत स्वरुप आहे. हे विधान निर्णायकपणे सत्य नाही. सर्वच भारतीय दर्शन मुळात काही धर्मग्रंथावर आधारलेले नाहीत. वेदांत दर्शनात अनेक शाखा आहेत. त्यापैकी त्याचा आधार वेद हे प्रमाण असून, त्याचा अर्थ स्पष्ट करणे हे त्या शाखेचे कार्य आहे. एवढ्या पुरतेच मर्यादीत त्यांची भूमिका दिसते. सांख्य व वैशेषिक दर्शनांनी कांही धर्मग्रंथ प्रमाण म्हणून स्वीकारतात. त्याचे प्रामाण्य हेच ज्ञानाच्या प्रामाण्याचा निकष समजतात. परंतू प्रामाण्य म्हणजे काय ? याचा अर्थ त्यांच्या दर्शनात कोठेच स्पष्ट केलेला दिसत नाही. या ज्ञान साधनाच्या द्वारे होणारे ज्ञान अंतिम सत्तेचे ज्ञान समजले जाते. या दर्शनाचा भारतीय दार्शनिक परंपरेतून झाला पण बौध्द दर्शनाचा मात्र याला अपवाद आहे. स्वतंत्र तत्वचिंतनाच्या प्रेरणेतून बौध्द दर्शनाचा उगम झालेला दिसून येतो.

बौध्ददर्शन भारतीय दर्शनाच्या परंपरेला बौध्दाची मोठी देण आहे. असे त्यांना वाटते. या सर्व दर्शनाचा आधार प्राचीन ऋषीची सूत्रे हाच होय या सुत्राचा आशय मात्र तात्विक होता. आकार मात्र नव्हता. सूत्राचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी 'वादविवाद' 'विधान'

'प्रतिविधान' 'उपमान' 'उदाहरण' याचा देखील स्वतंत्रपणे उपयोग करण्यात आलेला आहे. अशा प्रकारे तत्वचिंतन चालत असे. चर्चेचा विषय सुत्र असे सूत्र प्रमाण आहे अशी त्याची समजूत असे अशा पध्दतीचा उपयोग दर्शनकार स्वतःचा दर्शन विषयक दृष्टीकोण स्पष्ट करण्यासाठी करीत असत. सर्व भारतीय दर्शनकार मात्र 'गृहिततत्वाला' बळी पडलेले दिसतात हा सर्वांत मोठा दोष रेगे दाखवितात.

भारतीय दर्शनकारांनी बुध्दीला स्वतंत्र ज्ञान साधन, म्हणून मानले नाही. उलट धर्मग्रंथ प्रमाण मानले जात असत त्यातील सत्यतेचे स्वरुप स्पष्ट करण्यासाठी लागणारे साधन एवढेच महत्व त्यांनी दिले आहे. विचारांचा हेतु कांही सत्याचा शोध नाही. सत्य हे परंपरेने मान्य केले होते. तेच सत्य होय अशी भारतीय दर्शनकारांची धारणा दिसते.

पाश्चात्य दर्शनाची परंपरा स्वतंत्र सर्जनशील, व्यक्तिगत तत्वज्ञानाची परंपरा आहे. या परंपरेत एकापेक्षा एक श्रेष्ठ, कनिष्ठ तत्ववेते होवून गेले आहेत. त्यांनी आपल्या परीने तत्वज्ञानाला देणे दिलेली आहे. व्यक्तिगत विचारवंतावर सत्य म्हणजे काय ? त्याचे स्वरुप काय ? ते शोधण्याची त्याच्यावर जबाबदारी असे प्रत्येक विचारवंत कोणत्या तरी दर्शनाचा समर्थक असे सर्व भारतीय दर्शनकारांनी संवाद पध्दती ही तत्वज्ञानाची पध्दती मानलेली आहे, असे रेगे यांना वाटते. त्यामुळे सर्व भारतीय दर्शनाचा विकास हा एकत्र झालेला आहे सर्व दर्शनाचा विकास परस्पर सहकार्याने झालेला दिसतो. तात्विकी करणासाठी वरील पध्दतीचा वापर करीत मुळात दर्शनातील विचार, त्या विरोधी विचार, व्याख्या प्रतिव्याख्या, अशा पध्दतीने सर्व दर्शनाचा विकास झालेला आहे. प्रत्येक दर्शन एक संपूर्ण प्रणाली असे.

पाश्चात्य जगातील तर्कशास्त्राचा हेतु प्रमाण विचाराची आधारभुत तत्वे कोणती ? याचे संशोधन करण्याच्या प्रेरणेतून झालेला दिसतो. सर्व शास्त्रीय ज्ञान सिध्द करण्यासारखं असते. ज्ञानाच्या सिध्दतेला एक आरंभ बिंदू असतो. त्यांची सुरुवात सर्वमान्य व्याख्येपासून करावी लागते. प्रमाण विचारानूसार सर्वमान्य व्याख्या न्यायापासून निर्णय अपरिहार्यतेने निष्पन्न व्हावे लागतात. तर्कशास्त्राचे उद्दिष्ट प्रमाण ज्ञानाचे विश्लेषण व त्यास आधारभूत असलेली तत्वे स्पष्ट करणे हा असतो. न्याय दर्शन कारांनी ज्ञानाची तार्किक रचना व स्वरुप स्पष्ट करण्याचे उद्दिष्ट पूर्णपणे मानलेले दिसत नाही. न्याय दर्शनासमोर जे आदर्श होते ते निरनिराळ्या दर्शनातील तात्विक वाद न्यायदर्शनाकारांनी त्या वादग्रस्त विधानाची व्याख्या, बर्गीकरण व्याख्या, ऐवजी निरनिराळ्या दर्शनातील वादग्रस्त विधानाचे सूत्रीकरण करण्याचे उद्दिष्ट मानले असे त्याचे मत.

भारतात तात्विकरणाची पध्दती बाहेरून येवून का स्थिर होऊ शकली नाही ? याची कारणे अनेक आहेत. बुध्दी प्रणीत ज्ञानातील आकरा हाच ज्ञानातील दोष सुधारीत असतो. जर एखादी प्रणाली स्वायत्ततेचा दावा करीत असेल तर शास्त्रीय ज्ञानाच्या निकषावर ती प्रणाली टिकली पाहिजे. तत्वज्ञान हा मूल्यमापणात्मक दृष्टीकोण आहे. तत्वज्ञान नविन वस्तुमात्राकडे पाहण्याचा एक सुसंगत प्रयत्न असतो. या हेतूचा विसर मात्र भारतीय दर्शनिकाराला पडलेला दिसतो. याची जाणीव रेगे यांना होते बौध्दिक ज्ञानाची तत्वे व त्याची सिध्दता अशी करावी याचा विचार न्याय दर्शन कारांनी केलेला नाही ही नोंद रेगे ठेवतात. वाक्याचे विश्लेषण कसे करावे ? प्रमाण युक्तिवाद व त्याची रचना, व्याप्ती या अटीच्या द्वारे त्यांनी केलेला आहे.

वादीविदाच्या पध्दतीत विधानाचा विकास सिध्दी या दोन्ही गोष्टी साध्य होतात. न्याय दर्शन कारांनी 'अनुमान', 'पुरावा', त्याचे विश्लेषण उचितेच्या अटी, कोणत्या या बाबीचा विचार केलेला आहे.

न्याय दर्शन कारांनी सर्वमान्य युक्त ज्ञानाचा विचारच केलेला नाही. असा आक्षेप रेगे घेताना दिसतात. या दर्शनांनी 'बुध्दीला स्वतंत्र ज्ञान साधन' असा दर्जामान्य दिसत नाही. भारतीय दर्शनाच्या परंपरेचे गुण दोषासहित मूल्यमापन करताना रेगे यांनी आपले मत पण व्यक्त करुन आपली जबाबदारी पूर्ण करण्यास विसरत नाहीत. हे त्यांचे गुण डोळ्यात भरण्यासारखे आहेत.

**संदर्भ सुची :**

**प्रा.मे.पु.रेगे यांचे निवडक लेख खालील प्रमाणे.**


१) Some Reflections on Indian philosophical tradition - Quest, १९७४.

२) Humanism and Hindu Tradition, Quest, १९७७.

३) Idealism and Metaphysics, I.P.Q.-१९८९.

४) गांधीजी आणि बदलती मुल्ये - नवभारत - Jan. १९७०.

५) अनामिकाची चिंतणिका-नवभारत मे-१९७२.

६) बट्रांड रसेल यांचे तत्वदर्शन-सत्यकथा-जाने - १९६५.

७) जी. ई. मूर.- सत्यकथा, १९५९.

८) विचारवंताचे जग : व्याख्या आणि व्याप्ती - मौज-१९६८, दिवाळी अंक.

९) रुपवेध - सत्यकथा- जाने. १९६८.

१०) ऐहिक निष्ठा आणि सामाजिक मुल्ये-संक्रमण काळाचे आव्हान-संपा.भा.सं.भणगे.

११) प्रबोधनाचे स्वरुप, भारतीय प्रबोधन-१९७२.


□□□